# :जाहिर आवाहनः

## :: गोवर्धन गोवंश सेवा केंद्र (सुधारीत योजना) ::

गोवंशाचा सांभाळ (भाकडगाई,अनुत्पादक / निरोपयोगी बैल,वळू,इ.) करण्यासाठी गोशाळांना अर्थसहाय्य देण्यासाठी राज्यस्तरीय योजने अंतर्गत दि.26 एप्रिल 2017 च्या शासन निर्णयान्वये राज्यात राबविण्यांत आलेली गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही योजना रद्य करुन दि.08 मार्च 2019 च्या शासन निर्णयान्वये सुधारीत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही योजना सन 2019-20 या आर्थिक वर्षात परभणी जिल्हयातील परभणी/पाथ्री/सेलु या महसुली उपविभागा अंतर्गत प्रत्येकी एक या प्रमाणे गोशाळेची अनुदानासाठी निवड करण्यांस शासनाने मान्यता दिलेली आहे.या क्षेत्रात अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्थेमार्फत ही योजना राबविण्यांत येणार आहे.सदरची संस्था ही धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असावी तसेच संस्थेस गोवंश संगोपनाचा कमीतकमी 3 वर्षाचा अनुभव असावा.केंद्रावर असलेल्या पशुधनास आवश्यक असलेली वैरण/चारा उत्पादनासाठी तसेच पशुधन संगोपनासाठी संस्थेकडे स्वतःच्या मालकीची अथवा 30 वर्षाच्या भाडेपट्टयावरची किमान 5 एकर जमीन असावी.सदर योजने अंतर्गत निवड केलेल्या गोशाळेस पहिल्या टप्प्यात रु.15.00 लक्ष व दुसऱ्या टप्प्यांत रु.10.00 लक्ष असे एकुण रु.25.00 लक्ष अनुदान देय असणार आहे.संस्थेने या योजने अंतर्गत मागणी केलेल्या एकुण अनुदानाच्या कमीतकमी 10 टक्के एवढे खेळते भाग भांडवल संस्थेकडे असणे आवश्यक आहे.या शिवाय इतर अटी/शर्ती सदर शासन निर्णयात नमुद केल्या असुन सदर शासन निर्णय व अर्जाचा नमुना पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती (संबंधित) यांचे कार्यालयात तसेच जिल्हाधिकारी परभणी कार्यालयाच्या /जिल्हा परिषद परभणी च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक स्वंयसेवी संस्थांनी पंचायत समिती मार्फत स्वयंपुर्ण प्रस्ताव जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,परभणी या कार्यालयास सादर करण्याची अंतीम तारीख दि.30.06.2019 आहे.

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत लाभार्थी गोशाळांची निवड आणि अनुदान द्यावयाच्या आराखडयास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मा.मंत्री (पदुम) यांचे अध्यक्षतेखालील राज्य स्तरावरील समितीस असणार आहे.

तेंव्हा या क्षेत्रात अनुभव असलेल्या इच्छुक स्वंयसेवी संस्थांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त परभणी यांनी केले आहे.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
परभणी.